National Journal of Multidisciplinary Research and Development
ISSN: 2455-9040; Impact Factor: RJIF 5.22
www.nationaljournals.com
Volume 1; Issue 4; September 2016; Page No. 35-38

# खान्देशातील राजकीय व आर्थिक स्थितीचे ऐतिहासिक विश्लेषण (फारूकी राजवट ते अहिल्याबाई होळकर पर्यंत)

**प्रा0 व्ही0 जी0 सोमकुवर**

इतिहास विभाग, ग0 तु0 पाटील महाविद्यालय, नंदुरबार, महाराष्ट्र, भारत।

**सारांश**

आजच्या परिस्थितीत जळगाव, धुळे व नंदुरबार, नाशिकचा काही भाग या जिल्ह्याच्या भौगोलिक प्रदेशाला खानदेश म्हटले जाते। मध्ययुगीन काळात अहिल्याबाई होळकरांच्या काळापर्यंत या प्रदेशाचा बराच विस्तार झाला होता। अठराव्या शतकात संपूर्ण खानदेश मराठ्यांच्या ताब्यात आल्याचे दिसून येते। या भागाची आर्थिक स्थिती अंत्यंत सुब्बतेची असल्याचे आढळते। या प्रदेशात अहिल्याबाई होळकर यांनी लोककल्याणाच्या योजना राबवून जनतेला सुविधा पुरविल्याचे दिसून येते।

**मूल शब्द:** खान्देशातील राजकीय, आर्थिक स्थितीचे, फारूकी राजवट, अहिल्याबाई होळकर

## प्रस्तावना

### उद्देश

मध्ययुगीन काळात खानदेश हा आसिक तथा सेऊणदेश म्हणून ओळखल्या जात असे। या खानदेशच्या मध्ययुगीन इतिहासाचा प्रारंभ साधारणपणे इ.स.1300 पासून झाल्याचे मानले जाते।[1] मध्ययुगीन काळात हा प्रदेश अत्यंत सुपीक प्रदेश म्हणून ओळखला जात होता। त्यामुळे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात खानदेशच्या भौगोलिक स्थितीचे महत्त्व अनन्य साधारण असल्याचे दिसते।

पेशव्यांच्या काळात खानदेशातील नंदुरबार, सुलतानपुर, परगणे होळकरांना संरजामासाठी देण्यात आले होते।[2] या होळकर घराण्यातील कर्तबगार शासिका अहिल्याबाई होळकर या होत। अहिल्याबाई होळकरांनी संपूर्ण भारतात लोककल्याणाच्या योजना राबविल्याचे दिसून येतै। त्यापैकी खानदेशातही त्यांचा प्रभाव पडल्याचे आढळते। म्हणूनच अहिल्याबाई होळकर यांच्या काळापर्यंतची खानदेशातील राजकिय घडामोंडीची व आर्थिक स्थितीची माहिती समोर आणण्याचा प्रयत्न या शोध निबंधाव्दारे केला जात आहे।

खानदेश हा मध्ययुगीन काळात दख्खनच्या पठारांचा भाग समजला जात होता। इ.स.1370 मध्ये मलिक राजा फारूकी याने 'खानदेश' ला स्वतंत्र फारूकी घराण्याची स्थापना केली। त्यापूर्वी खानदेश यादवांच्या ताब्यात होता। नंतर अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिण भारत जिंकल्यावर यावर सुलतानाची राजवट प्रस्थापीत झाली। पुढे मोगल, मराठा व शेवटी इंग्रजांची राजवट खानदेशावर प्रस्थापित झाल्याचे दिसते। जून 1818 मध्ये ब्रिटिशांनी जिंकून घेतलेला दख्खनचा मूलूख डेक्कन कमिशर्नसच्या कार्यकक्षेत मोडत होता।[3] ह्या प्रदेशात महाराष्ट्रातील पुणे, नगर, नाशिक, सातारा आणि खानदेश यांचा समावेश होता। सन 1818 ते 1947 पर्यंत खानदेशावर ब्रिटिशांचा अंमल होता। त्यापूर्वी प्राचीन आणि मध्ययुगीन काळात विविध घराण्यांच्या राजवटी खानदेशात राज्य करीत होत्या। त्यांच्यापैकी फारूकी राजवटी पासून तर होळकर घराण्यापर्यंतच्या अहिल्याबाई होळकरांपर्यंत च्या राजकीय व आर्थिक घडामोंडीचा आढावा देण्याचा प्रयत्न केला जात आहे।

## खानदेशचे भौगोलिक स्थान व सिमा विस्तार

खानदेशाचा भूभाग हा 20.10⁰ ते 21.58⁰ उत्तर अक्षाशांवर आणि 73. 37 ते 73.20 रेखांशाच्या दरम्यान आहे। या जिल्ह्याची 173 मैल इतकी आणि क्षेत्रफळ 9311 चौरस मैल होते। सन 1849 पर्यंत जिल्ह्याचा काही भाग अहमदनगर जिल्ह्याला जोडलेला होता। खानदेश गैझोटमध्ये या प्रदेशाचे भौगोलिक स्थान 20.8⁰ ते 22.7⁰ उत्तर अक्षांश आणि 73.42 ते 76.28 रेखांशाच्या दरम्यान चौरस मैल असल्याचे दिले आहे। उत्तरेकडील राजमार्गापासून बऱ्याच लांब अंतरावर हा दुर्लक्षीत असा प्रदेश होता। त्यामुळे दिल्लीच्या सुलतांनी या प्रदेशाकडे दुर्लक्षच केले होते।[4]

उत्तरेकडील 30 ते 40 मैल लांबीचा सातपुडा पर्वत ही खानदेशाची उत्तरेकडील सीमा होती।[5] पूर्वेकडील सिमा शिंदे आणि निजामाच्या राज्यापर्यंत होती।[6] ईशान्येला होळकरांचे राज्य होते। दक्षिणेला चांदवडचा किल्ला, आणि अंजिठा घाट किंवा रातमाळ पर्वत रांगा, नैऋत्येला सह्याद्री पर्वत रांगा, पश्चिमेकडीला सिमा गुजरातला लागून असून व्यायव्येला सोनगड किल्यापासून तापी नदीपर्यंतच्या सिमेच्या आतील प्रदेश (8) म्हणजे तत्कालीन खानदेशचा प्रदेश होय।

## खानदेश नावाची उत्पत्ती

या प्रदेशाला रामायणात ''ऋषीक'' असा उल्लेख केलेला आढळतो। याबाबत आपले मत डॉ0 मिराशिंनी संशोधन मुक्तावलीत मांडले आहे। दशकुमार चरित्रात (8 वे शतक) हा प्रदेश 'ऋषीक देश' म्हणूनच ओळखला गेला आहे। यानंतरच्या काळात यादव राजवटीबरोबर हा प्रदेश सेउन देश असा ओळखला जात होता।

यादव काळात 'सेउन देश' म्हणून प्रसिध्द असलेला दख्खनच्या अति उत्तर पठाराऱ्या भागाला 'खानदेश' असे नाव आज वापरात आहे। हा प्रदेश म्हणजे विस्तीर्ण आणि पश्चिमेकडे उतार असलेले खोरे आहे। यातून तापी नदी पूर्व पश्चिम वाहते।[9]

कान्हदेश म्हणजेच कृष्णाचा देश यावरून खानदेश हा शब्दप्रयोग झाला असावा असे काही लोकांचे मत आहे। येथे अभिर किंवा गौळी राजे राज्य करीत त्यांचा प्रमुख कृष्ण किंवा कान्हा त्याचा हा देश तो खानदेश असे समजले जाते।[10]

फारूकी राजवटींमध्ये मलीक राजा फारूकी याच्याकडे खानदेशची सत्ता आली। दुसरा फारूकी सुलतान नसिरखान फारूकीच्या काळी म्हणजे इ.स.1399–1437 दरम्यान या प्रदेशास 'खानदेश' हे नाव प्राप्त झाले असावे असे अबुल फजल नमुद करतो।[11]

आजचा नाशिक व खानदेश शिवाय मध्यप्रदेशातील नेमाड या प्रदेशांचा समावेश पूर्वीच्या खानदेशात होत असे। प्रारंभी थाळनेर तद्नंतर बऱ्हाणपूर, ही मध्ययुगीन खानदेशाची राजधानी होती।

साधारणपणे इ.स. (1370–1600) या काळात फारूकी घराण्यांने राज्य केले। त्यानंतर इ.स.1601 च्या आरंभी अकबराने आसीरगडाचा पाडाव करून फारूकी राज्य मुघल साम्राज्याला जोडले। व या प्रदेशाला 'दानदेश' असे नाव दिले। पण हे नाव रूढ झाले नाही आणि आजही या प्रदेशास 'खानदेश या नावानेच संबोधले जाते।[12]

**राजकीय घडामोडींचा आढावा**

**अ) सुलतांनाची राजवट**

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून मध्ययुगीन इतिहासाला प्रारंभ झाल्याचे मानले जाते। इ.स. 1206 पासून दिल्लीवर सुलतांनाची राजवट सुरू झाली। सुल्तानशाहीतील खिलजी घराण्यातील सुल्तान अल्लाउद्दीन खिलजी याने देवगीरीच्या यादवांचा पराभव करून दक्षिणेत मुस्लीम सत्तेचा पाया घातला। खानदेश यावेळी यादवांच्याच ताब्यात होता। सन 1318 मध्ये यादवांचे राज्य पूर्णपणे जिंकण्यात आले। तेव्हापासून खानदेश हा दिल्लीच्या सुल्तांनाच्या राजवटीखाली गेला।[13]

इ.स. 1321 मध्ये खिलजी राजघराणे सत्ताहीन होऊन तुलघकांकडे दिल्लीची सत्ता गेली। तुघलकाच्या काळात खानदेशचा समावेश वऱ्हाड सुभ्यात असून सुभा मुख्यालय अचलपूरला होते। इ.स. 1321 मध्ये बहामनी राज्याची स्थापना दक्षिणेत झाली। तेव्हा 'नंदुरबार व सुलतानपूर' सरकार वगळता खानदेशचा सर्व भाग दिल्लीच्या सुलतानांकडेच होता।[14]

**ब) फारूकी घराण्यांची राजवट (सन 1382 – 1600)**

फारूकी घराण्याची राजवट स्वतंत्ररित्या स्थापन करण्याचे श्रेय मलीक राजा फारूकी याच्याकडे जाते। फिरोजशहा तुघल्काने सन 1370 मध्ये त्याची खानदेशचा सुभेदार म्हणून नियुक्ती केली होती। त्याने 'थाळनेर' ला आपले सुभा मुख्यालय बनविले होते। पुढील काळात फिरोजशहा तुघलक म्हातार, झाल्यावर याने सन 1382 मध्ये स्वतःचे स्वातंत्र घोषित केले। आणि अशाप्रकारे या प्रदेशात फारूंकीची स्वातंत्र राजवट सुरू झाली।[15]

मलिक राजा फारूकी याच्यानंतर त्याचा मुलगा मलिक नासिर हा फारूकी घराण्याचा अधिपती बनला। त्याने आपली राजधानी बऱ्हाणपुर येथे प्रस्थापित केली। त्याच्यानंतर मिरन आदिलखान हा सत्तेवर आला। त्याच्या मृत्युनंतर मिरान मुबारक खान हा सत्तारूढ झाला। याचा मृत्यू सन 1457 मध्ये झाला।

सन 1457 मध्ये आदिलखान फारूकी दुसरा हा सत्तेवर आला। याच्या काळात गुजरातचा शाशक महमूद बेगडा याने स्वारी करून खान्देशची बरीच नासधूस केली होती। तो निपूत्रीक मरण पावल्यामुळे गादीच्या वारसासाठी संघर्ष होऊन दाऊदखान याला गादी मिळाली। त्याच्या मृत्यू पश्चात आदिलखान तिसरा शासक बनला व त्याने बऱ्हाणपूरला राजधानी केली।


आदिलखान तिसरा याच्यानंतर मिरान मुहम्मदशहा फारूकी पहिला हा शासक झाला। त्याच्या मृत्यूनंतर मीरान मुबारकशहा फारूकी दुसरा सत्तेवर आला। याच्या काळात खानदेशचा मुघलांशी प्रथमच संबंध आला।

मीरान मुबारक दुसरा याच्यानंतर त्याचा मुलगा मुहम्मदशहा दुसरा (1566–1576) दुसरा गादीवर आला। त्यानंतर राजा अलिखान (1576 – 1597) हा शासक झाल। याने मोगलांचे मांडलीकत्व स्विकारले होते। तो सन 1597 रोजी मरण पावला। त्यानंतर त्याला मुलगा बहादूरशहा (बहादूरखान) हा फारूकी घराण्याचा शेवटचा शासक झाला। याने मोगलांचे मांडलिकत्व झुगारल्यामुळे अकबराने याच्यावर स्वारी करून शरणागती पाकरण्यास भाग पाडले। त्याने डिसे.1600 मध्ये शरणागती पत्करली। आणि त्यानंतर खानदेशातील फारूकी घराण्यांची राजवट समाप्त झाली।[16]

**फारूकी घराण्याची वंशावळ पुढीलप्रमाणे.**

**मलिक राजा तथा राजा अहमद**

**(1982 – 1399)**




**खानदेश मुघलांच्या राजवटी खाली (1601–1707)**

मुघल सम्राट अकबर याने सन 1600 मध्ये खानदेशावर स्वारी केली। सन 1601 मध्ये खानदेश अकबराने जिंकला। हा प्रांत मुघल साम्राज्याला जोडण्यात आला। या प्रांतला अकबराने आपला मुलगा दानियल याच्या सन्मानार्थ 'दानदेश' असे नाव दिले। पण पुढे खानदेश हेच नाव प्रचलित झाले।[18]

दानियलनंतर इ.स. 1608 मध्ये राजपूत्र परविझ खानदेशचा सुभेदार झाला। त्याने बऱ्हानपुरला दक्षिणेचे मुख्यालय ठेवले होते। त्याच्यानंतर 'शहाजहान' हा दक्षिणेचा सुभेदार झाला। शहाजहान बरीच वर्षे खानदेशात होता। शहाजहान बादशहा बनल्यावर त्याने औरंगजेब यास दक्षिणेचा सुभेदार नेमले। सन 1634 मध्ये खानदेशचा स्वातंत्र सुभा करून बऱ्हाडचा काही भाग, गाळणा, बागलाण, यांचा समावेश खानदेश सुभ्यात करण्यात आला। याच्या काळात दक्षिणेकडील प्रदेशांची चार सुभ्यांमध्ये विभागणी करण्यात आली होती।

1) खानदेश
2) दौलताबाद
3) बालाघाट
4) वऱ्हाड

औरंगजेबाने बऱ्हाणपूरमधील दख्खनी सुभा मुख्यालय स्थलांतरीत करून औरंगाबादला केले।[19] दख्खनच्या सुभेदाराकडेच खानदेशाच्या सुभ्याची देखभाल करण्याची आणि प्रशासनाची जबाबदारी मुघल बादशहाने सोपविली होती।

औरंगजेबाने सन 1644 मध्ये उत्तरेकडे परत गेल्यावर अधिकारारूढ असलेल्या मुघलांच्या दख्खनवरील सुभेदारांची नावे पुढे दिली आहेत।

| | |
|---|---|
| ''1) खान दौरान | मे 1644 ते जून 1645। |
| 2) मीर्झा राजा जयसिंग | जून–जुलै 1645। |
| 3) इख्लास खान | जुलै 1645 ते नाव्हें,1647 |
| 4) शहानवाजखान | डिसें. 1647 ते जून 1648। |
| 5) शहाजादा मुरादबक्ष | जुलै 1648 ते सप्टें. 1649। |
| 6) शायीस्तेखान | सप्टें. 1649 ते डिसें. 1652 |
| 7) औरंगजेब | जाने. 1653 ते 5 फेब्रु.1658''(20) |

औरंगजेब बादशहा झाल्यानंतर दाऊदखान पन्नी आणि त्यानंतर सय्यद हुसेन अली यांची सत्ता होती। सन 1600 मध्ये दख्खनच्या सुभ्याची पुनर्रचना करण्यात आली होती। त्याप्रमाणे त्यात सहा सुभ्याचा समावेश होता। ते असे. 1. खानदेश, 2. वऱ्हाड, 3. औरंगाबाद, 4. बिदर, 5. हैद्राबाद, 6. बिजापूर त्यापैकी खानदेश सुभ्यामध्ये सहा जिल्हे होते. ते असे 1. आसीर, 2. बागलाण, 3. विजयगड, 4. हंडीया, 5. नंदुरबार, 6. गाळणा।[21]

### खानदेश पेशण्यांच्या ताब्यात

औरंगजेब बादशहाच्या काळात दाऊदखान पन्नी आणि त्यानंतर सय्यद हुसेन अली याची खानदेशवर सत्ता होती। दाऊदखान पन्नी आणि हुसेन अली यांच्यात संघर्ष झाला। त्यामध्ये दाऊदखान पन्नी ठार झाला। खानदेशवर सय्यद हुसेन अली याचे वर्चस्व होते।

इ.स.1607 मध्ये औरंगजेब बादशहाचा मृत्यू झाला। आणि मुघलांच्या कैदेतून शाहूची सुटका झाली। शाहुने आपले आसन स्थिर केल्यावर दक्षिणेतील सहा सुभ्यामधून चौथाई वसूल करण्याचा हक्क मागितला। यावेळी हुसेन अली खान याने मराठ्यांशी समझोता करून मुआइझम या मुघल बादशहाची परवानगी घेतली। व त्यानुसार मराठ्यांना खानदेश आणि इतर सुभ्यातून चौथाई वसूल करण्याचा हक्क दिला। त्यामुळे शाह आणि त्याच्या मराठा सरदारांनी खानदेशातील जमिनदार व सुभेदार यांच्या कडून चौथाईच्या वसूलीची मागणी केली। खानदेशावर सय्यद हुसेन अली या दक्षिणेतील मुघल सुभेदाराचा अंमल इ.स.1620–21 पर्यंत होता।[22]

दक्षिणेतील सुभ्याचा सुभेदार म्हणून निजाम उलमुल्क याची नियुक्ती झाली होती। त्याने दक्षिणेतील सुभ्यातून चौथाई वसूल करण्यास मराठ्यांना विरोध केला। शेवटी बाजीराव पेशवा याने इ.स.1728 ते 1730 या काळात निजामाला नमवून खानदेशच्या मोकासा वसूलीचा अधिकार मिळविला होता। हा संघर्ष सन 1752 पर्यंत सुरूच होता। परंतु पुढे पेशवा नानासाहेब यांनी निजामाशी संघर्ष करून त्याचा पराभव केला। अभयंतात तह झाला। या तहालाच भालकीचा तह म्हणतात। या तहानुसार निजामाने मराठ्यांना खानदेश, बागलाग, गाळणा, संगमनेर, नाशिक, त्र्यंबक इ. प्रदेश दिले। त्यानंतर सन 1760 मध्ये उद्‌गतिरच्या लढाईत निजामाचा पूर्ण पराभव करून सर्व खानदेश पेशव्यांच्या ताब्यात आला होता।[23]

### अहिल्याबाई होळकर आणि खानदेश

होळकर घराण्याची स्थापना मल्हारराव होळकर यांनी केली। मराठा राज्याचे साम्राज्यात रूपांतर करणाऱ्या सरदारापैकी मल्हारराव होळकर हे एक होत। पेशव्यांनी साम्राज्य विस्तार करण्याकरिता अनेक घराण्यातील सरदारांना हाताशी घेतले होते। त्या सरदारांपैकीच मल्हारराव होळकर होत। मराठ्यांचा उत्तर भारतात साम्राज्य विस्तार करण्यात हे प्रमुख होते। अहिल्याबाई होळकर या ह्या पराक्रमी सरदार/सुभेदार मल्हारराव होळकर याची सून होय।

पेशव्यांनी मराठ्यांच्या ताब्यात आलेल्या प्रदेशांची वाटणी आपल्या सरदारांत केली होती। तेव्हा मल्हारराव होळकर यांना सन 1727 मध्ये संरजामासाठी 11 महाल दिले। त्यापैकी खानदेशातील एक महाल होता।[24] मल्हारराव होळकर यांच्यानंतर मालेराव होळकर घराण्याचा वारस झाला। परंतु त्याचे इ.स. 1767 मध्ये निधन झाले। त्यानंतर अहिल्याबाई होळकर यांच्याकडे होळकर घराण्याचा मुलखी कारभार आला। अहिल्याबाई सत्तेवर आल्या तेव्हा खानदेशातील नंदुरबार, सुलतानपुर हे प्रदेश होळकरांच्या जहागीरीचे होते।[25]

अहिल्याबाई होळकर यांच्या काळापासून ते मराठेशाहीच्या अंतापर्यंत खानदेशचा बहुतांश भाग इंदोरच्या होळकरांकडे होता। 21 डिसें. 1817 रोजी सातपूड्याच्या दक्षिणेकडील सर्व भाग खानदेशचा संपूर्ण भाग इंग्रजांकडे गेला।[26]

### आर्थिक स्थिती

खानदेशची जमीन अंत्यत सुपीक होती। तापी नदीच्या काठावर असल्यामुळे उत्पन्न भरपूर मिळत होते। ज्वारी, कापूस व भात ही या प्रदेशातील मुख्य पिके होती। नवापूर–नंदुरबारचा तांदुळ प्रसिध्द होता। यावल, चोपडा, एरंडोल, नवापूर, नंदुरबार व बऱ्हाणपुरचा कापूस सर्वत्र प्रसिध्द होता। एरंडोलची आंब्याची बाग खूप, प्रसिध्द होती। या पिकाव्यतिरिक्त चोपड्याला निळीचे पीक, एरंडोल व शेंदुर्णीला ऊस आणि एदलाबादला द्राक्षे पिकविली जात असत।[27]

खानदेशातील तापी नदीच्या मुखावरील सुरत बंदर प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी प्रसिध्द होते। सतराव्या शतकात इस्ट इंडीया कंपनीने मुख्यालय स्थापन केले होते। त्यामुळे इतर व्यापारी कंपन्याही तेथून परदेशी व्यापार करीत। त्यामुळे बऱ्हाणपूरहून रावेर, सावदा, फैजपूर, यावल, चौपडा व थाळनेर मार्गे सुरतला जाणारा खानदेशातील माल निर्यात होण्यास उत्तेजण मिळाले होते।[28]

बऱ्हाणपूर, बहादूरपूरा, थाळनेर, नंदुरबार व मुल्हेर याव्यतिरिक्त धरणगाव, चोपडा, यावल, अडावद ही गावे व्यापारी केंद्रे म्हणून प्रसिध्द होती। धरणगावचे हातमाग कापड आणि व्यापार इतका प्रसिध्द होता की, तेथील उत्पादित माल इंग्लंड व पर्सियाला सुरतमार्गे निर्यात होत असे। यावल हे गाव तेथील कापूस, फळे, ऊस व विड्याची पाने याबाबत प्रसिध्द होते।[29]

बऱ्हाणपूरहून सुरत, औरंगाबाद, हैद्राबाद, वऱ्हाड, जोधपूर व आग्रा या शहरांना जाणारे रस्ते होते। पेशव्यांना अहिल्याबाई होळकर यांना या प्रदेशातून जमिन महसूल, आयात–निर्यात कर, याव्दारे मोठ्या प्रमाणात जहागिरीचे उत्पन्न मिळत असल्याचे आढळून येते।

### संदर्भ


1. डॉ0 चौधरी वि0का0 महाराष्ट्र राज्य गॅझोटिअर, जळगांव जिल्हा, कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, 1994, पृ.क्र. 67।
2. डॉ0 देशपांडे प्र0 न0 व हजरनीस व.ग. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळाचे त्रैमासिक संशोधक, इतिहासार्च वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, जून–सप्टें. 1998, पृ.क्र.3–4।
3. खरे ग. ह. आणि कुलकर्णी अ.रा. (संपा). मराठ्यांचा इतिहास, खंड–3 कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1986, प्र.क्र. 319।
4. वाघ दि.मू. मराठी सत्तेच्या उदयाची भौगोलिक मिमांसा, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे त्रैमासिक वर्षे 63 वे अंक 1–54 (1983–84) पृ.क्र.115।
5. खानदेश जिल्हा गॅझेटिअर, भाग–12, नांम्बे 1880, (सुधारित आवृत्ती 1985), प्र.क्र. 1।

6. ओक प्रमोद – एलिफिस्टन, राजहंस प्रकाशन, पुणे. दु.आ. 1999 पृ.क. 161।
7. खानदेश जिल्हा गॅझेटिअर – पूर्वोक्त, पृ.क. 01।
8. Torgal D.M. – Gazetter of Bombay presidency, Vol.XII, Khandesh District, 1880, पृ.क.01.
9. बलसेकर दिलीप व भामरे सर्जेराव – खानदेश फारूकी घराणे इतिहास व नाणी, IRNS Publications, नाशिक, जाने. 2006, पृ.क. 14।
10. उपरोक्त – पृ.क. 14।
11. अबुल फझल – ऐण–ए–अकबरी, खंड–2, 1989, पृ.क. 234।
12. बलसेकर दिलीप व भामरे सर्जेराव – पूर्वोक्त, पृ.क. 15।
13. Gazetter of the Bombay Presidency, Vol.XVI, NASHIK, Printed at the Government central press, 1883, P.N. 187.
14. डॉ0 चौधरी वि.का. – पूर्वोक्त, पृ.क. 80।
15. डॉ0 महाजन टी.टी.– खानदेशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास, कॉन्सिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, 1998, पृ.क. 25।
16. शेरवानी, जोशी (संपा) – हिस्टरी ऑफ मिडिव्हल डेक्कन खंड–1, पृ.क. 497।
17. डॉ0 चौधरी वि.का.–पूर्वोक्त, पृ.क. 82।
18. सरदेसाई गोविंद सखाराम – हिंदुस्थानचा अवचीन इतिहास, बडोदे संस्थान प्रकाशित, बडोदे, 1898, पृ.क. 207।
19. सरदेसाई – मराठी रियासत, खंड–1, 1988, पृ.क. 172।
20. डॉ0 चौधरी वि.का. – जळगांव जिल्हा गॅझेटीअर, पूर्वोक्त, पृ.क. 93।
21. पगडी सेतु, माधवराव – महाराष्ट्र आणि मराठे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, 1963, पृ.क. 66।
22. डॉ0 महाजन टी.टी. – पूर्वोक्त, पृ.क. 245।
23. उपरोक्त – पृ.क. 282।
24. खरे ग.ह. आणि कुलकर्णी अ.रा.– मराठ्यांचा इतिहास खंड तिसरा (1761–1818), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 1986, पृ.क. 431।
25. डॉ0 सौ0 पाटील सुलोचना अशोक– होळकर कुलभुषण अहिल्यादेवी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रगती मंडळ, जळगांव, प्रथमावृत्ती 2000, पृ.क. 65।
26. डॉ0 चौधरी वि.का. – जळगांव गॅझेटियर, पूर्वोक्त, पृ.क. 103।
27. उपरोक्त – पृ.क. 100।
28. उपरोक्त – पृ.क. 68।
29. डॉ0 महाजन टी.टी.– पूर्वोक्त, पृ.क. 198, 199, 200, 202।